# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

द्वारा संलग्नित

## सुदामा शिक्षण संस्था, तुमसर

द्वारा संचालित

# श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय, तुमसर

## जि. भंडारा

# "आजादी का अमृत महोत्सव"

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

## राष्ट्रीय सेवा योजना
## २०२२ - २३

## विशेष शिबीराचा अहवाल

# युवकांचा ध्यास : ग्राम-शहर विकास

दि. ०१ फेब्रुवारी ते ०७ फेब्रुवारी २०२३

:: स्थळ ::

जि.प.पू. माध्यमिक शाळा, नवरगांव, ता. तुमसर, जि. भंडारा.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी
प्रो. डॉ. मुबारक कुरैशी

प्राचार्य
श्रीमती गोपिकाबाई भुरे
महिला महाविद्यालय, तुमसर
जि. भंडारा

Scanned with OKEN Scanner

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर अहवाल

श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय, तुमसर तर्फे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत **"युवकांचा ध्यास : ग्राम शहर विकास"** या संकल्पनेवर आधारित सात दिवसीय विशेष शिबीर **दि. 1 फेब्रुवारी ते 7 फेब्रुवारी 2023** पर्यंत नवरगांव तालुका व तहसिल तुमसर येथे आयोजित होते. दिनांक 1 फेब्रुवारी 2023 रोज बुधवारी 50 शिबीरार्थीनीं सोबत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. मुबारक कुरैशी यांचे शिबीर स्थळी म्हणजे जि.प. पूर्व माध्यमिक शाळा, नवरगांव येथे आगमन झाले. ग्रामवासीयांच्या समस्या जाणून घेऊन कार्यक्रमाची दिनचर्या ठरविण्यात आली.

**दि. १ फेब्रुवारी २०२३, बुधवार : आगमन**

शिबीरार्थीनींचे आगमन नवरगांव या गावात झाले आणि विशेष शिबीराच्या पूर्व तयारीला सुरूवात झाली. नवरगांवात ग्रामतपंचायतीला भेट देऊन तसेच गावकऱ्यांशी भेटी घेऊन जनजागरण रॅली काढण्यात आली व त्या अनुषंगाने सात दिवसीय शिबीरातील घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करून ग्राम स्वच्छता व शिबीर परिसर स्वच्छता घेण्यात आले.

**दि. २ फेब्रुवारी २०२३, गुरूवार : उद्घाटन**

सकाळी प्रार्थना झाल्यावर शिबीरार्थीनी प्रभात फेरी काढली. प्रभात फेरीच्या माध्यमातून दूसऱ्या दिवशी होणाऱ्या आरोग्य निदान शिबीराबद्दल माहिती देण्यात आली. शिबीरार्थींनी लेझिम व ढोल, बैंडच्या माध्यमातून तसेच आरोग्य जनजागृति चे स्लोगन हातात धरून ही रॅली काढली. त्यात ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील नवरगांव तसेच गावातील वयोवृध्द स्त्रीयां व शाळेकरी विद्यार्थिनींनी सक्रीयपणे सहभाग घेतला.

सकाळी 11.00 वाजता राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे उद्घाटन झाले. तत्प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक मा.श्री. प्रजेश जैपाल लाडसे, सरपंच ग्रामपंचायत नवरगांव, अध्यक्ष मा.श्री. नारायणरावजी तितीरमारे, संस्थापक, श्री सुदामा शिक्षण संस्था,



Scanned with OKEN Scanner

तुमसर हे होते. प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री. प्रमोदभाऊ तितीरमारे, सचिव, श्री सुदामा शिक्षण संस्था, तुमसर तसेच पाहुणे म्हणून मा.श्री. निलेंश गोपीचंद गुर्वे, उपसरपंच ग्रा.पं. नवरगांव, ग्रामसेवक श्री अश्विन डोहळे, मा.सौ. मिनाक्षी चंद्रशेखर लाडसे, पोलिस पाटिल नवरगांव, मा.सौ. संध्या प्रभाकर गुर्वे, माजी सरपंच ग्रा.पं. नवरगांव, ग्रा.पं. नवरगांव सदस्य श्री उमाशंकर बाबुराव कामथे, श्री. बंडु अरूण कामथे, सौ. दिपीका विनोद गुर्वे, सौ. लक्ष्मी रविन्द्र लाडसे, सौ. राखी दिनेश गुर्वे, सौ. मयुरी दिपक गुर्वे, ग्रा.पं. कर्मचारी श्री. प्रशांत घनश्याम गुर्वे, तंटामुक्त समिती अध्यक्ष, श्री. कृष्णा नत्थुजी गुर्वे, मुख्याध्यापक, जि.प.पूर्व माध्यमिक शाळा, नवरगांव श्री. राजन सव्वालाखे, प्राचार्य, डॉ. युवराज सेलोकर हे उपस्थित होते. दिप प्रज्वलित करून शिबीराचे उदघाटन झाले. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत झाल्यावर कार्यक्रमाविषयी प्रास्ताविक प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर यांनी केले. उद्घाटक सरपंच नवरगांव यांनी शिबीरार्थीनींना शुभकार्यात सहकार्य करण्याची हमी देऊन शुभेच्छा दिली. या शिबीराचे चांगले संस्कार गावकऱ्यांवर होतील असा आशावाद व्यक्त केला. प्रमुख अतिथी मा. प्रमोदभाऊ तितीरमारे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची संकल्पना स्पष्ट करून त्याच्या महत्वाची जाणीव करून दिली. तरूण शक्ति देशासाठी अर्पण करा असा आव्हान सुद्धा केला. अध्यक्षीय भाषणातून मा. अध्यक्षांनी, महाविद्यालयाच्या समाजकार्यात मोलाचा वाटा राहिलेला आहे ही परंपरा कायम राहील असे उद्गार काढले.

नवरगांव पोलिस पाटील मा. सौ. मिनाक्षी लाडसे, यांनी "सातही दिवस मी व ग्रामपंचायत सतत शिबीर यशस्वी करण्याकरिता मोलाची भूमिका बजवतील व तत्पर राहील तसेच मुलींना सुरक्षिततेची काळजी करण्याची गरज नाही हि जवाबदारी आमच्यावर आहे तुम्ही बिनधास्तपणे आपल्या मांगल्य कार्याला साकार करा असे आश्वासन दिले. प्राचार्या यांनी आपल्या भाषणातून "मुलींनी सावित्रीबाई प्रमाणे नाव लौकिक करावे व समाजाप्रति आपले कर्तव्य पार पाडावे, मुली मुलांपेक्षा कमी नाही असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रो.डॉ. मुबारक कुरैशी यांनी केले तर आभार मराठी विभाग प्रमुख डॉ. गामा सेलोकर यांनी केले. उपस्थित अतिथीगण व गावकऱ्यांनी उदघाटनानंतर स्नेहभोजनाचा आनंद घेतला.



Scanned with OKEN Scanner

**दि. ३ फेब्रुवारी २०२३, शुक्रवार**

सकाळी प्रात:विधी आटोपल्यावर प्रार्थना घेण्यात आली. या विशेष शिबीराचे वैशिष्ट म्हणजे साई योगा क्लासेस, तुमसरचे योग शिक्षक, योगगुरू श्री सुजय भुरे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सकाळी 6.30 ते 7.30 वाजेपर्यंत समस्त गावकऱ्यांसाठी योग शिबीर आयोजित होता. हा शिबीर शिबीराच्या पूर्ण कालावधीत घेतला गेला. सुदृढ आरोग्याकरिता योगासने व प्राणायाम किती आवश्यक आहे व ते केव्हां व कसे करायचे या मार्गदर्शनातून त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले. या शिबीराला शाळेकरी विद्यार्थ्यांचा तसेच गावकऱ्यांचा प्रचंड सहकार्य लाभला.

योग शिबीर संपल्यावर सकाळी 7.30 वा. अल्पाहार घेण्यात आले. सकाळी 8 वाजेपासून आरोग्य, शिक्षण व इतर विषयावर स्लोगन घेऊन शिबीरार्थीनींनी ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटील, सरपंच, उपसरपंच यांच्या सहकार्याने स्वच्छता रॅली अभियान व आरोग्या संबंधी जनजागृति केली. शिबीरार्थींनी ढोल व बॅन्डच्या तालावर लेझिम खेळून गावभर स्वच्छता व आरोग्य विषयक जनजागृति केली. त्यांनंतर श्रमदान करण्यात आले. गावाचा मुख्य रस्ता तसेच गावातील इतर रस्ते स्वच्छ करण्यात आले.

सकाळी 11.00 वाजेपासून प्रायमरी हेल्थ सेन्टर देव्हाडी व उपकेंद्र बाम्हणीच्या सौजन्याने आरोग्य निदान शिबीर आयोजित होता. या शिबीरात डॉ. प्रेरणा खराबे (Community Health Officer) कु. हर्षा तरारे (Technician, Dewhadi, PHC) श्री डी.जी. कडव (MNW) सौ. दुर्गा मोरेश्वर गुर्वे (आशा वर्कर), श्री. बी.डी. भवसागर (AVM) सौ. सरिता मोरेश्वर गुर्वे (BLO) यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निदान शिबीर संपन्न झाले. या शिबीरात बी.पी., शुगर, हिमोग्लोबिन व थायरॉईडची चाचणी करण्यात आली. त्यात 110 लोकांचे बी.पी., शुगर चाचणी करण्यात आले तर 87 लोकांचे आभा कार्ड तयार करून देण्यात शिबीरार्थीनी मदत केली. यात 63 लोकांचे थाईरॉईड टेस्ट सुद्धा झालेत. बहुसंख्येने गावकऱ्यांच्या सहभागाने शिबीराला प्रचंड प्रतिसाद मिळाला.



Scanned with OKEN Scanner

**दि. ४ फेब्रुवारी २०२३, शनिवार**

सकाळी प्रातःविधी व प्रार्थना झाल्यावर योग शिक्षक श्री सुजय भुरे यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली स. 6.30 ते 7.30 पर्यंत नवरगांव ग्रामवासी–शाळेकरी विद्यार्थी, लहान मुले, तरूण–तरूणी, वृद्धांसाठी योग शिबीर घेण्यात आले. स्वस्थ आरोग्य व आजच्या संदर्भातील पर्यावरण प्रदूषणावर मात करण्यासाठी योगासने किती महत्वाचे आहेत व दैनंदिन जीवनात यांच्या अंतर्भावाने किती फायदे होतील या संबंधी जनजागृति करण्यात आली. प्राणायाम, सूर्यनमस्कार सुद्धा घेण्यात आले. याचा लाभ बहुलतेने घेण्यात आले.

त्यानंतर अल्पाहार संपन्न झाल्यावर मतदार जनजागृतिवर स्लोगनच्या माध्यमातून बँड व लेझिमच्या मदतीने रॅली काढण्यात आली. शिवाय सकाळी 8.00 वाजेपासून ते 10.30 पर्यंत श्रमदानाच्या माध्यमातून गाव प्लॉस्टिक मुक्त करण्याचा प्रयत्न ही करण्यात आला व गावात जिकडे तिकडे पडलेली प्लॉस्टिक बॅग, पाण्याची बॉटल, खर्र्याचे पॉलिथीन उचलून कचराकुंडीत टाकण्यात आले. यात गावकऱ्यांचा व ग्रामपंचायतीचा भरपूर सहकार्य मिळाला.

स. 11.00 वाजता नव मतदार जनजागृति व नोंदणी कार्यक्रम आयोजित होते. सहा. मतदार नोंदणी अधिकारी व तहसिलदार, तुमसरच्या सक्रिय सहभागाने हा नवमतदार जनजागृति शिबीर आयोजित होता. शिबीर यशस्वीपणे संपन्न करण्याकरिता श्री सुरेंद्र चौरागडे, निवडणूक लिपीक, तहसिल कार्यालय तुमसर, श्री जयदास गिरडकर, निवडणूक ऑपरेटर, तहसिल कार्यालय तुमसर, आर.एच. पंचबुद्धे कोटवार तहसिल कार्यालय तुमसर, सौ सरिता मोरेश्वर गुर्वे (BLO) यांनी मोलाचे सहकार्य दिले.

श्री सुरेंद्र चौरागडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून सांगितले की गावातील 17 वर्षे पूर्ण झालेल्या तरूण–तरूणींनी सुद्धा मतदार कार्ड बनविण्याची प्रक्रिया सुरू करून द्यावी व जर तुम्ही 2023 च्या जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर महिन्याच्या तारखेला किंवा त्याच्या आधी 18 वर्षाचे होणार असाल तर त्या–त्या तिमाहीत अर्ज क्र. 6 भरून मतदार नोंदणी करू शकता. तर श्री जयदास गिरडकर यांनी सांगितले की, "जर लोकशाही टिकवायची असेल तर मतदारांनी आपल्या अधिकारांचा वापर करून योग्य उमेदवार निवडून द्यावे". नवमतदारांनी याचा पुरेपुर लाभ घेतला. जवळ जवळ 32 नवमतदारांनी यात नोंदणी केली.



Scanned with OKEN Scanner

दुपारच्या जेवणानंतर 3.00 वा. ग्राम सर्वेक्षण करण्याकरिता शिबीरार्थीनीं सहा गटात विभाजित होऊन क्रमशः राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, राजमाता जिजाऊ, सिंधूताई सपकाळ, ताराबाई शिंदे गट बनवून निघाल्या. त्यात स्त्री–पुरूष अनुपात, साक्षरता, कोरोना लसीकरण, व्यवसाय, जोडधंदे, आभा कार्ड संबंधी सर्वेक्षण करण्यात आले व अहवाल तयार करण्यात आला. रात्री जेवणानंतर शिबीरार्थीनींनी जनजागृतिवर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

**दि. ५ फेब्रुवारी २०२३, रविवार**

सकाळी प्रार्थना झाल्यावर नेहमी प्रमाणे योग शिक्षक सुजय भुरे यांच्या मार्गदर्शनाखाली योग शिबीर संपन्न झाले. रविवारच्या दिवस असल्या कारणाने शाळेकरी विद्यार्थी, तरूण मुला मुलींनी यात सक्रिय सहभाग घेतले. त्यानंतर सर्वांना अल्पाहार देण्यात आले. अतिशय उत्साहाने सर्व जमलेले लोक जनजागृति रॅली साठी सोबत आले. पर्यावरण प्रदूषण, साक्षरता, आरोग्य, स्वच्छते संबंधी स्लोगन हातात धरून ढोल व डफलीच्या माध्यमातून ही रॅली गाजत वाजत पूर्ण गावभरात फिरली. शिबीरार्थींनी स्वच्छता अभियान सुद्धा हाती घेतला. त्याला ग्रामपंचायतीचा व गावकऱ्यांचा पूर्ण सहकार्य मिळाला. घरोघरी लोकांशी संपर्क करून त्यांना त्याचे महत्व पटवून देण्यात आले.

दुपारी जेवणानंतर 12.00 वा. "सखी वन स्टॉप" या एन.जी.ओ.च्या माध्यमातून कौटुंबिक हिंसाचार या विषयावर मार्गदर्शन आयोजित होते. या कार्यक्रमात सौ लता भुरे, केंद्र प्रशासक, सखी वन स्टॉप, भंडारा, सौ वैशाली वाघाडे, समुपदेशिका व सौ काजल गुर्वे, समुपदेशिका यांनी मार्गदर्शन केले. सर्वप्रथम सौ वैशाली वाघाडे यांनी 'सखी वन स्टॉप' या एन.जी.ओ.च्या स्थापनेची उद्दिष्टे व कार्यपद्धती बद्दल माहिती दिली. तर सौ लता भुरे यांनी सांगितला की, प्रशिक्षित समुपदेशकांमार्फत अत्याचार ग्रस्त व गरजू महिलांना कश्या प्रकारे पोलिस सहाय्य दिला जातो. 18 वर्षा खालील पीड़ित मुलींना तात्पुरता निवारा देणे, वैद्यकीय मदत पुरविणे व कायदेविषयक सल्ला देणे हा 'सखी वन स्टॉप' चे कार्य आहे असा मार्गदर्शन देण्यात आला तर किशोरवयीन मुलींच्या समस्या, यौन शोषण इतरांबाबत ही शिबीरार्थींनी सोबत हितगुज करण्यात आली.



Scanned with OKEN Scanner

दुपारी 2.00 वा. महिला एवं बाल कल्याण विकास मंत्रालय, भारत सरकार द्वारा संचालित ''चाईल्ड लाईन, भंडारा'' च्या माध्यमातून मार्गदर्शन आयोजित होते. श्री विजय बी. रामटेके, अध्यक्ष, चाईल्ड हेल्पलाईन, भंडारा, श्री सुनिल पी. राणे, समुपदेशक चाईल्ड हेल्पलाईन, भंडारा यांनी चाईल्ड हेल्पलाईन 1098 रात्र–दिवस संकटाच्या वेळी लहान मुलांसाठी कसे काय करते ? त्याबद्दल सविस्तर माहिती पुरविली. या एन.जी.ओ.च्या माध्यमातून लहान मुलांचा समुपदेशन केला जातो, त्यांच्या राहण्याची व्यवस्था, आरोग्य सुविधा, शिक्षणाची व्यवस्था, पुनर्वसन व लैंगिक किंवा इतर शोषणापासून संरक्षण, बालमजूराची समस्या, गुमशुदा बालकांची समस्या बद्दल माहिती देण्यात आली.

सायंकाळी 3.00 वा. पासून नवरगांव महिला बचतगट मेळावा आयोजित होता. त्यात वेगवेगळया बचत गटांनी आपआपल्या कार्याविषयी माहिती दिली. बचत गटाच्या सहकार्याने शिबीरार्थींनी विविध मनोरंजनात्मक खेळ आयोजित केले. त्यात चमचा गोळी, संगीत खुर्ची यात वयोवृद्ध गावकरी, लहान मुले, तरूण–तरूणींने अतिशय उत्साहाने सहभाग घेतला.

या शिवाय विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमही आयोजित होते. स्त्री शिक्षणाचे महत्व, व्यसन मुक्तीवर नाटिका आयोजित होती.

**दि. ६ फेब्रुवारी २०२३, सोमवार : समारोपीय कार्यक्रम**

रोजच्या प्रमाणे प्रार्थना झाल्यावर गावकरी सकाळी 6.30 वा. शिबीरात आले. या दिवशी शिबीरार्थींनींच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांनी व्यायाम व आसने व प्राणायाम केले. त्यानंतर अल्पाहार घेतला व रॅलीच्या माध्यमातून जनजागृति केली, ग्राम स्वच्छता, श्रमदान केले.

दु. 12.00 वाजता समारोपीय कार्यक्रमाला सुरूवात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. शरदरावजी तितीरमारे अति व्यस्त असून सुद्धा समारोपीय कार्यक्रमात आवर्जुन उपस्थित झाले. तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री. प्रजेश जैपाल लाडसे, सरपंच, नवरगांव, श्री निलेश गोपीचंद गुर्वे, उपसरपंच, ग्रामसेवक, श्री अश्विन डोहळे, पोलिस पाटील नवरगांव सौ मिनाक्षी चंद्रशेखर लाडसे, श्री कृष्णा नत्थुजी गुर्वे, तंटामुक्त समिती अध्यक्ष, नवरगांव, श्री. राजन सव्वालाखे, मुख्याध्यापक, जि.प.पू.मा. शाळा, नवरगांव, प्राचार्य, डॉ. युवराज

सेलोकर तसेच मा. श्री विनोदभाऊ तितीरमारे, उपाध्यक्ष श्री सुदामा शिक्षण संस्था, तुमसर उपस्थित होते. सर्वप्रथम या सात दिवसीय शिबीरातील झालेल्या कार्यक्रमाचे अहवाल वाचन रा.से.यो. अधिकारी प्रो. डॉ. मुबारक कुरैशी यांनी केले व नंतर शिबीरा संबंधी मनोगत कु. दिव्या भाजीपाले व कु. रीया पटले यांनी व्यक्त केले. कार्यक्रम अधिकारी प्रो. डॉ. मुबारक कुरैशी यांनी सरपंच नवरगांव, श्री प्रजेश जैपाल लाडसे, उपसरपंच निलेश गुर्वे, पोलिस पाटील सौ. मिनाक्षी चंद्रशेखर लाडसे, मुख्याध्यापक राजन सव्वालाखे आणि समस्त ग्रामपंचायत सदस्यगण व गावकऱ्यांचे आभार मानले. सरपंचानी शिबीराच्या उत्कृष्ट कार्यपद्धतीची, सात दिवसीय कार्यक्रमाची मुक्त कंठाने प्रशंसा केली. त्यांनी आपल्या भाषणातून म्हटले की ''अश्या प्रकारच्या शिबीराचा पहिल्यांदाचा आयोजन आमच्या गावी करण्यात आलेला आहे. हा आमच्या पहिलाच अनुभव आहे. शिबीरातील कार्यक्रमामुळे नक्कीच गावकरी बोध घेतील. पुढच्या वर्षी शिबीर पुन्हा याच गावी घ्यावे अशी आमची आशा आहे''. तर ग्राम सेवकांनी शिबीरातील अनुशासन, विविध उपयुक्त मार्गदर्शन व यशस्वी आयोजनाची प्रशंसा केली व विद्यार्थीनींनी आभा कार्ड बनविल्या बद्दल अभिनंदन दिले. पोलिस पाटिल सौ. मिनाक्षी लाडसेनी शिबीरार्थीनींचे कौतुक केले व शिबीरांतर्गत घेण्यात आलेले कार्यक्रम विशेष म्हणजे योग शिबीराचे महत्व व उपयुक्तता सांगितली. या सात दिवसीय विशेष शिबीराचे निश्चितच फायदे गावकऱ्यांना मिळणार असे विचार मा. शरदरावानी व्यक्त केले, तर प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर यांनी उत्कृष्ट शिबीर व्यवस्थापना करिता शिबीरार्थीनींना व कार्यक्रम अधिकाऱ्यांना अभिनंदन दिले. योग शिबीर व आरोग्य शिबीरातील थायरॉईड चाचणी व आभा कार्ड बनविल्या बद्दल स्तुति केली. आमच्या मुली कुठेही कमी नाहीत, पुढे जाण्याची त्यांची तयारी आहे, असे उद्गार काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रो. डॉ. मुबारक कुरैशी यांनी केले तर कु. सुषमा हटवार हिने नवरगांव ग्रामवासी, ग्रामपंचायत, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, पोलिस पाटील यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



Scanned with OKEN Scanner

शिबीरा करिता मा. श्री विनोदभाऊ तितीरमारे, उपाध्यक्ष श्री सुदामा शिक्षण संस्था, तुमसर, महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. निता गभणे, प्रा. मंगेश वागदे, डॉ. गामा सेलोकर, प्रा. अशोक चोपकर, प्रा. उमेश चव्हाण, प्रा. गायत्री सिरसाम आणि शिक्षकेत्तर कर्मचारी श्रीकृष्ण तितीरमारे, कु. पारधी, मालू पेशने व देशमुख यांचे सहकार्य मिळाले.

दि. 1 फेब्रुवारी ते 7 फेब्रुवारी 2023 पर्यंत घेण्यात येणाऱ्या विशेष शिबीरात दैनंदिन कार्यक्रमांमध्ये ग्राम स्वच्छता, सार्वजनिक स्थळे सफाई, जन–जागरण रॅली जनजागृतिवर पथनाट्य, साक्षरता, स्त्री–शिक्षण, पर्यावरण संरक्षण संबंधी कार्यक्रम आयोजित होते. तसेच आरोग्य निदान शिबीर, योग शिबीर व नवमतदार नोंदणी शिबीराच्या माध्यमातून गावकऱ्यांना बहुसंख्येने लाभान्वित करण्याचा, संकल्प पूर्ण करण्याचा निर्धार ही संपन्न झाला. गावकऱ्यांच्या समस्या जाणून त्या–त्या विषयावर मार्गदर्शनात्मक, रचनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**७ फेब्रुवारी २०२३, शनिवारी : निरोप व प्रस्थान**

पुन्हा एकदा ग्रामपंचायतीला भेट देऊन सर्व साहित्यनिशी नवरगांव या गावाचा निरोप घेतला.

**सहभाग आभार :**

राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर यशस्वी करण्याकरिता नवरगांव सरपंच मा.श्री प्रजेश जैपाल लाडसे, उपसरपंच श्री निलेश गोपीचंद गुर्वे, ग्रामसेवक श्री अश्विन पी. डोहळे, पोलिस पाटील सौ. मिनाक्षी चंद्रशेखर लाडसे, मुख्याध्यापक श्री राजन सव्वालाखे, ग्रामपंचायत सदस्यगण मार्गदर्शक वक्ते संसर्गजन्य रोग तपासणीपथक बाम्हणी, पी.एच.सी. देव्हाडी, नवमतदार नोंदणी विभाग, तहसिल कार्यालय, तुमसर, सखी वन स्टॉप, भंडारा, चाईल्ड हेल्पलाईन, भंडारा, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग या सर्वांचा सहकार्य मिळाला. प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर, मा. श्री विनोदभाऊ तितीरमारे, उपाध्यक्ष श्री सुदामा शिक्षण संस्था, तुमसर यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे व सरपंच, मुख्याध्यापक यांच्या मदतीमुळे आमचे सात दिवसीय विशेष शिबीर नवरगांव येथे यशस्वीरित्या संपन्न झाले.

S.G.B. Mahala Mahavidyalaya 441912 Tumsar

N. S. S.
Programme Officer
S.G.B.Mahila Mahavidyalaya
Tumsar

Principal
S.G.B. Mahila Mahavidyalaya
Tumsar



Scanned with OKEN Scanner

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

द्वारा संलग्नित

## सुदामा शिक्षण संस्था, तुमसर

द्वारा संचालित

# श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय, तुमसर

## जि. भंडारा

**राष्ट्रीय सेवा योजना**
**२०२२ - २३**

## वार्षिक अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी
प्रो. डॉ. मुबारक कुरैशी
इतिहास विभाग प्रमुख
श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा

प्राचार्य
श्रीमती गोपिकाबाई भुरे
महिला महाविद्यालय, तुमसर
जि. भंडारा

Scanned with OKEN Scanner

# राष्ट्रीय सेवा योजना
# वार्षिक अहवाल २०२२-२३

श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय, तुमसर येथे सत्र 2022–2023 ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने खालील प्रमाणे विविध कार्यक्रम आयोजित होते.

**१) जागतिक योग दिवस : २१ जून २०२२**

दि. 21 जून 2022 ला महाविद्यालयात जागतिक योग दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यात महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर वर्ग व विद्यार्थीनींनी प्रचंड प्रतिसाद दिला. कोरोना नंतरच्या तणावातील मानसिकता सुधारण्या करिता प्राणायाम व विविध आसने किती आवश्यक आहे याची जाणीव या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आली.

**२) जागतिक लोकसंख्या दिवस : ११ जुलै २०२२**

11 जुलै 2022 रोजी महाविद्यालयात ''लोकसंख्या–स्फोट'' जागतिक समस्या' या विषयावर परिचर्चा आयोजित होती. विद्यार्थिनींनी या वर आपली मते व्यक्त केली. प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर व नॅक समन्वयक डॉ. कनीज बानू कुरैशी यांनी मार्गदर्शन केले.

**३) राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रक कार्यक्रम : १ ऑगष्ट २०२२**

दि. 1 ऑगष्ट 2022 ला राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रक कार्यक्रमाअंतर्गत ''प्रतिबंधात्मक जीवशास्त्रीय उपाययोजना'' अंतर्गत गप्पी मासे महाविद्यालयाच्या परिसरात असलेल्या पाणीच्या टाकीत सोडण्यात आले. हा कार्यक्रमाला श्री. एस.पी. आकरे (आ. सहाय्यक), श्री. एस.के. गायधने (आ. कर्मचारी), श्री. ए.पी. उके (आ. कर्मचारी), श्री. एस. बी. गणवीर (आ. कर्मचारी), सु.बो. शासकीय उप जिल्हा रूग्णालय, तुमसर यांच्या उपस्थितीत राबविण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर व शिक्षकवृंद उपस्थित होते.

**४) हर घर तिरंगा उपक्रम : १२ ऑगष्ट २०२२**

मा. सहसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांच्या पत्रान्वये 'हर घर तिरंगा' उपक्रमाअंतर्गत विद्यार्थिनीं, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाला तिरंगा झेंडा

Scanned with OKEN Scanner

वाटप करण्यात आले व त्यांना आप–आपल्या घरी तिरंगा लावण्याचे प्रोत्साहन देण्यांत आले.

**५) आज़ादी का अमृत महोत्सव : १३ ऑगष्ट २०२२**

दि. 13 ऑगष्ट 2022 रोजी 'आज़ादी का अमृत महोत्सव' या निमित्ताने महाविद्यालयात झेंडावंदन करण्यात आला. या प्रसंगी देशभक्ति पर गीत गायन स्पर्धा आयोजित होती. तसेच 'हर घर तिरंगा' उपक्रमा निमित्त जनजागरण रॅली सुद्धा काढण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखविली.

**६) स्वातंत्र्य दिना निमित्त ध्वजारोहण कार्यक्रम : १४ ऑगष्ट २०२२**

दि. 14 ऑगष्ट 2022 रोजी श्री नितीन बोराडे, वनवैभव आदिवासी आश्रमशाळा, कोका जंगल यांचे हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाले. तत्प्रसंगी विद्यार्थिंनी, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**७) स्वतंत्रता दिन : १५ ऑगष्ट २०२२**

15 ऑगष्ट 2022 ला स्वतंत्रता दिना निमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर, यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच विद्यार्थीनीं करिता पोस्टर स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले.

**८) 'शिक्षक दिवस' : ५ सप्टेंबर २०२२**

दि. 5 सप्टेंबर 2022 रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. या निमित्त महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी 'स्वयंशासन' केले. तिन्ही वर्गातून उत्कृष्ट स्वयंशासन करणाऱ्या विद्यार्थीनींना बक्षिसे देण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवृंद यांचे पुष्पगुच्छ व भेटवस्तु देवून सम्मानीत करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थीनींनी भाषण, कविता वाचन, गीत सादर केले.

**९) 'आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन': ८ सप्टेंबर २०२२**

राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने भाषण प्रतियोगितेचे आयोजन करण्यात आले. 'नवीन शिक्षण प्रणाली' हा निबंधाचा विषय होता. यात 12 विद्यार्थिनींना सहभाग घेतला.

Scanned with OKEN Scanner

### १०) 'जिल्हास्तरीय युवा उत्सव' : १३ सप्टेंबर २०२२

13 सप्टेंबर 2022 रोजी नेहरू युवा केंद्र भंडारा, युवा कार्यक्रम खेल मंत्रालय, भारत सरकार व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा स्तरीय युवा उत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून सौ. मिरा भट्ट आणि कु. जयश्री बिसने यांना आमंत्रित करण्यात आले होते. चित्रकला, फोटोग्राफी, भाषण आदि स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रतियोगीते मध्ये साई कॉलेज, मोर कॉलेज, जनता ज्युनियर कॉलेज, तुमसर आणि श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थीनींनी भाग घेतला.

### ११) 'स्वच्छता ही सेवा मोहीम' : १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२२

या कार्यक्रमा अंतर्गत 'स्वच्छता अभियान, प्लास्टीक वापर बंदी, वातावरण प्रदूषण आणि आरोग्य विषयक जागृती आदि घेण्यात आले. 28 सप्टेंबर 2022 ला घोष–वाक्य प्रतियोगिता घेण्यात आली. 29 सप्टेंबर 2022 ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थीनींनी अथक परिश्रम करून प्लास्टीक बॅग, रॅपर, बॉटल, पॉलीथीन इत्यादी गोळा करून सुरक्षित पद्धतीत नष्ट करण्यात आले. 30 सप्टेंबर 2022 ला प्रमुख अतिथी श्री. सुजय भुरे यांनी प्लास्टीकमुळे होणारे दुष्परिणाम बद्दल मार्गदर्शन केले.

### १२) राष्ट्रीय पोषण माह : १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२२

श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय तुमसर व एस.एन. मोर कॉलेज, तुमसर यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय पोषण पंधरवाडा' निमित्त मार्गदर्शन व आनंद मेळा व स्पर्धेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व गृह अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त पुढाकाराने दि. 16 सप्टेंबर 2022 रोज एन.एन. मोर कॉलेज, तुमसरला "Food Festival & Exhibition" म्हणून आयोजित होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, प्रो.डॉ. मुबारक कुरैशी व गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख, प्रो.डॉ. कल्पना राऊत प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित होते. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व त्यांना पारितोषिक सुद्धा मिळाले. विद्यापीठ शताब्दी महोत्सव अंतर्गत 'कमवा आणि शिका' हा कार्यक्रम सुद्धा आयोजित करण्यात आले.

Scanned with OKEN Scanner

**१३) निर्सगोपचार मार्गदर्शन : २३ सप्टेंबर २०२२**

23 सप्टेंबर 2022 ला शिक्षक व शिक्षकेत्तर वर्ग यांच्या करिता निर्सगोपचारावर मार्गदर्शन आयोजित करण्यांत आले.

**१४) राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस व शपथविधी कार्यक्रम : २४ सप्टेंबर २०२२**

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, प्रो.डॉ. मुबारक कुरैशी यांनी स्वयंसेविकांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापनेची उद्दिष्टे स्पष्ट केलीत तसेच या दिनाचे औचीत्य साधुन समाज व राष्ट्र विकासाकरीता शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर यांनी स्वयंसेविकांना समाजाप्रती निष्ठेने, स्वेच्छेने कार्य करण्याचे आवाहन केले. तत्प्रसंगी तालुकास्तरीय सामूहीक गोंडी नृत्य स्पर्धा आयोजित होती. प्रस्तुत कार्यक्रमात प्रथम क्रमांक शहीद वीर संतोष कुमार पेंदाम, गोंडी लोककला मंच, संचालक समीर कुंभरे ग्रुप चिखली तर द्वितीय क्रमांक महाविद्यालयाने पटकविला.

**१५) महाविद्यालय स्थापना दिवस : २८ सप्टेंबर २०२२**

28 सप्टेंबर 2022 रोजी महाविद्यालयाचा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता आपले योगदान दिले. या प्रित्यर्थ आनंद मेळा आयोजित करण्यात आले. त्यात विद्यार्थिनींनी खूप आनंद लुटला. या कार्यक्रमात श्री. प्रमोद नारायणरावजी तितीरमारे, सचिव श्री सुदामा शिक्षण संस्था, तुमसर यांनी सरस्वतीपूजन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर उपस्थित होते.

**१६) स्वच्छता अभियान : २९ सप्टेंबर २०२२**

या अभियाना अंतर्गत महाविद्यालयात परिसर स्वच्छता घेण्यात आली. विद्यार्थिनींने परिसरातील रस्ते स्वच्छ करण्यात आले. हा अभियान महाविद्यालयापासून ते रेल्वे टाऊन पर्यंत घेण्यात आले.

**१७) महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री जयंती : २ ऑक्टोबर २०२२**

दिनांक 2 ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री जयंती निमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. युवराज सेलोकर, प्राचार्य यांनी प्रतिमेला माल्यापर्ण करून गांधीची व शास्त्रीजी च्या जीवन चरित्र व विचारसरणीवर प्रकाश टाकले. या कार्यक्रमाचे

Scanned with OKEN Scanner

प्रमुख अतिथी प्रो.डॉ. मुबारक कुरैशी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी तसेच प्रो. डॉ. कल्पना राऊत यांनी भूषविले व मार्गदर्शन केले.

**१८) बॅग मेकिंग कार्यशाळा : ४ ऑक्टोबर २०२२**

राष्ट्रीय सेवा योजनाच्या स्वयंसेविकांनी बॅग मेकिंग कार्यशाळेत भाग घेतला. ही कार्यशाळेत श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय तुमसर आणि आर्ट्स कॉलेज सिहोरा यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. श्री यशवंत बडवाईक (लघु गृह उद्योजक) तुमसर यांनी आपले अमूल्य मार्गदर्शन दिले.

**१९) कबड्डी टुर्नामेंट : १० ऑक्टोबर २०२२**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांनी रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर आंतर महाविद्यालय महिला कबड्डी स्पर्धा (zone c) चे आयोजन करण्याकरिता आपला बहुमूल्य योगदान दिले. या कार्यक्रमाकरिता प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री. प्रमोद नारायणरावजी तितीरमारे, सचिव श्री सुदामा शिक्षण संस्था, तुमसर आणि सौ. मेश्राम मॅडम जिल्हा क्रिडा अधिकारी, भंडारा उपस्थित होत्या.

**२०) *'महिला सशक्तीकरण व सायबर क्राईम' मार्गदर्शन शिबिर : १४ ऑक्टोबर २०२२**
***६६ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन**

या कार्यक्रमाला पाहुणे म्हणून उपस्थित कु. वृंदा गायधने (समुपदेशक, पोलिस स्टेशन, तुमसर), सौ. सीमा बेलेकर (सहाय्यक महिला व बालविकास अधिकारी, तुमसर) श्री अमोल बोपचे (उपकार्यक्रम अधिकारी, आबादा फांउडेशन) आणि प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर होते. कार्यक्रमचे प्रास्ताविक प्रो.डॉ. मुबारक कुरैशी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केले. कु. वृंदा गायधने यांनी महिला सशक्तीकरण या विषयावर आपले मत व्यक्त करून व वाढत्या सायबर क्राईम द्वारा होणारे दुष्परिणाम व सजकते बद्दल मार्गदर्शन केले. सौ. सीमा बेलेकर व श्री. अमोल बोपचे यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त मार्गदर्शन केले. संचालन व आभार प्रदर्शन प्रो.डॉ. मुबारक कुरैशी यांनी केले.

**२१) *ए.पी.जे. कलाम जयंती : १५ ऑक्टोबर २०२२**
***जागतीक अन्न दिवस**
***जागतीक पांढरीकाठी दिवस**
***जागतीक प्रेरणा दिवस**

Scanned with OKEN Scanner

राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे अब्दुल कलाम जयंती निमित्त वाचनप्रेरणा दिन साजरे करण्यात आले. तसेच हात धुवा व पांढरी काठी दिवस हे साजरे केले गेले. सदर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री वैभव चोपकर, जिल्हा अध्यक्ष AISF हे उपस्थित होते. विद्यार्थीनींना वाचनाची प्रेरणा मिळावी म्हणून स्वयंसेविका कु. पूर्वाली पटले, कु. आचल शेंडे, लीना शेंडे यांनी अग्निपंख पुस्तकातील काही अंश वाचून दाखविले. या प्रसंगी कु. प्रेरणा सिंगनजुडे, मिनाक्षी मेहर, सतीश चिंधालोरे उपस्थित होते. या प्रसंगी श्री. वैभव चोपकर व कार्यक्रम अधिकारी प्रो.डॉ. मुबारक कुरैशी यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर हात धुण्याची वैज्ञानिक पद्धती सांगुन स्वयंसेविकांनी व अतिथींने हात धुतले.

**२२)** "Massive plastic waste collection and Deposit Day" : **१९ ऑक्टोबर २०२२**

राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविकांनी महाविद्यालय परिसर, रस्ता, दुर्गा नगर कॉलनी येथील प्लॉस्टीक व कुडा–कचरा गोळा केला व दुर्गानगर कॉलनीच्या कचऱ्यापेटीत टाकला तसेच महाविद्यालयातील गोळा केलेले कचऱ्याची होळी केली.

**२३) 'महापरीनिर्वाण दिन' : ६ डिसेंबर २०२२**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरीनिर्वाण' दिना निमित्त 6 डिसेंबर 2022 ला प्रो.डॉ. मुबारक कुरैशी, कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना यांनी प्रतिमेला माल्यार्पण केले. तसेच कार्यक्रमाला प्रा. मंगेश वागदे (ग्रंथपाल) आणि डॉ. गामा सेलोकर (मराठी विभाग) यांनी सुद्धा आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे संचालन प्रो.डॉ. मुबारक कुरैशी यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. सार्वे हिने केले.

**२४) 'इंडीयन नेशनल कॉंग्रेस विज्ञान ज्योत रॅली' : ३ जानेवारी ते ७ जानेवारी २०२३**

या कार्यक्रमा अंतर्गत जे.एम. पटेल कॉलेज, भंडारा तर्फे इंडीयन नेशनल कॉंग्रेस विज्ञान ज्योत रॅली काढण्यात आली. या कार्यक्रमात प्रो.डॉ. मुबारक कुरैशी, कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना आणि महाविद्यालयातील 36 स्वयंसेविकांनी रैलीत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. रॅलीत सहभागी झाल्याबद्दल स्वयंसेविकांना टोपी व शर्ट सुद्धा वाटप करण्यात आले. ही रॅली जे.एम. पटले कॉलेज पासून तर मुस्लिम लाईब्ररी व तेथून बस स्टॅण्ड, त्रिमूर्ती चौक व नंतर जे.एम. पटेल कॉलेजला परतली. रॅलीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढोमणे यांनी संबोधन करून आभार व्यक्त केले.

**२५) क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले जयंती : ३ जानेवारी २०२३**

Scanned with OKEN Scanner

दि. 3 जानेवारी रोजी रा.से.यो.च्या वतीने क्रांति ज्योति सावित्रीबाई फुले जयंती साजरी केली गेली. या प्रसंगी सावित्रीबाईच्या फोटोला माल्यार्पण करून आदरांजली अर्पित करण्यात आली. त्यानंतर मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. उमेश चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थीनींनी सुद्धा भाषणे दिलीत. या प्रसंगी डॉ. निता गभणे, डॉ. उमेश चव्हाण, प्रा. मंगेश वागदे उपस्थित होते.

**२६) राष्ट्रीय मतदार दिवस : २५ जानेवारी २०२३**

दि. 25 जानेवारी 2023 रोज बुधवारी तहसिल कार्यालय तुमसर, पत्राच्या निर्देशनानुसार रा.से.यो. तर्फे राष्ट्रीय मतदार दिवस साजरे करण्यांत आले. या प्रसंगी प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग, विद्यार्थीनींनी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेतली.

**२७) गणतंत्र दिवस : २६ जानेवारी २०२३**

दि. 26 जानेवारी 2023 ला महाविद्यालयात गणतंत्र दिवस साजरे करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर यांनी ध्वजारोहण केले. शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनीं ने उत्स्फूर्तपणे उपस्थिती दर्शविली.

**२८) 'राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर' ग्राम-नवरगांव : १ ते ७ फेब्रुवारी २०२३**

दि. 1 ते 7 फेब्रुवारी 2023 पर्यंत नवरगांव, तालुका, तहसिल, तुमसर येथे ''युवकांचा ध्यास : ग्राम–शहर विकास'' या संकल्पनेवर आधारित सात दिवसीय विशेष शिबीर आयोजित होता. यात स्वच्छता, आरोग्य निदान शिबीर, नवमतदार जनजागृती शिबीर व जनजागृती पर कार्यक्रम आयोजीत होते.

**२९) छत्रपती शिवाजी महाराज जयंती : १९ फेब्रुवारी २०२३**

महाविद्यालयातील रा.से.यो. विभाग व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने 19 फेब्रुवारी 2023 रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी ''शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची संकल्पना व आजचा धर्मांध प्रचार'' या विषयावर व्याख्यान आयोजित होता. प्रमुख वक्ते म्हणून श्री राहुल डोंगरे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थिनीं मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

## ३०) संत गाडगे महाराज जयंती : २३ फेब्रुवारी २०२३

स्वच्छता व बुद्धिवादाचे महामेरू कर्मयोगी संत गाडगे महाराजांच्या जयंतीला अनुसरून रा.से.यो. व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता मोहिम महाविद्यालयापासून ते दुर्गा माता मंदिरा पर्यंत राबविण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयात वृक्षारोपणाचे कार्यक्रम सुद्धा आयोजित होते. सदर कार्यक्रमात रा.से.यो. स्वयंसेविका, श्री विनोद तितीरमारे, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## ३१) राष्ट्रीय जंतनाशक कार्यक्रम : १ ते १० मार्च २०२३

1 ते 10 मार्च 2023 पर्यंत महाविद्यालयात राष्ट्रीय जंतनाशक कार्यक्रमांतर्गत विद्यार्थिनींना अल्बेन डॅझोलच्या गोळ्या वाटप करण्यात आल्या. हा कार्यक्रम सुभाषचंद बोस शासकीय रूग्णालय, तुमसर व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आले. 250 विद्यार्थिनींन या मोहिमे अंतर्गत लाभार्थी झाल्यात.

## ३२) जागतिक महिला दिवस : ८ मार्च २०२३

8 मार्च 2023 ला महाविद्यालयात जागतिक महिला दिवस साजरे करण्यात आले. विद्यार्थिनींनी महिला शिक्षिकांना फूल देऊन त्यांचे सन्मान केले व शुभेच्छा दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर यांनी विद्यार्थिनींना प्रोत्सहानात्मक मार्गदर्शन केले.

## ३३) 'प्रेरणा' राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीर : १३ ते १७ मार्च २०२३

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षा निमित्त पाच दिवसीय 'प्रेरणा' राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीरात सहभागी होण्यासाठी महाविद्यालयातील रा.से.यो. स्वयंसेविका कु. रिया पटले (द्वितीय वर्ष) हिची निवड संपूर्ण भंडारा जिल्हयातून विद्यापीठाकडून करण्यात आली. या विद्यार्थिनींने शिबीरात यशस्वीपणे सहभाग घेतला.

## ३४) District Neighbourhood Youth Parliament 2023 : 16 मार्च 2023

दि. 16 मार्च 2023 ला जे.एम. पटेल कॉलेज, भंडारा व नेहरू युवा केंद्र संगठन, भंडारा च्या संयुक्त विद्यमाने Neighbourhood Youth Parliament आयोजित होती. कार्यक्रम जे.एम. पटेल कॉलेज, भंडारा येथे आयोजित होता. मा.श्री. योगेश कुम्भेजकर,

कलेक्टर, भंडारा जिल्हा, मा.श्री. लोहित मतानी, पुलिस अधीक्षक, मा.श्री. हितेंद्र वैद्य, जिल्हा युवा अधिकारी, नुरचंद पाखमोडे, राष्ट्रीय ट्रेनर यांनी मार्गदर्शन दिला. यात राष्ट्रीया सेवा योजना स्वयंसेविका, कु. सेजल टेंभरे, कु. अर्चना पारधी, कु. पल्लवी बांते हयांनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्षभर सक्रीयपणे वेगवेगळे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेचे संपूर्ण श्रेय कार्यक्रम अधिकारी प्रो.डॉ. मुबारक कुरैशी व रा.से.यो. पथक स्वयं सेविकांना जाते. 10 स्वयंसेविकांच्या रा.से.यो.च्या युनिटने महाविद्यालयातच नव्हे तर इतरत्र ही कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व आपली समाजाप्रति जबाबदारी पार पाडली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर यांनी यथोचित मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले.

S.G.B.Mahala Mahavidyalaya 441912 Tumsar

N. S. S.
Programme Officer
S.G.B.Mahila Mahavidyalaya
Tumsar

Principal
S.G.B. Mahila Mahavidyalaya
Tumsar

Scanned with OKEN Scanner